N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर — **P.S.(ठाणे):** चतु:श्रृंगी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1030 — **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/12/2024 04:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 27/12/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/12/2024
**Time From (वेळेपासून):** 14:56 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:06 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/12/2024 — **Time (वेळ):** 04:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 007

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/12/2024 04:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** — **Beat No. (बिट क्र.):**

पश्चिम, 06 किमी

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय, ,बाणेर, पुणे येथील आवारात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

FIR प्रत विनामुल्य मिळाली

Chakankar
संदिप बबन चकणकर



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संदिप बबन चाकणकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सव्हे नंबर 149/1, चाकणकर मळ,तान्हाई बिल्डींगजवळ, बालेवाडी ,रोड, बाणेर, पुणे 411045 ,चतु:श्रृंगी ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सव्हे नंबर 149/1, चाकणकर मळ,तान्हाई बिल्डींगजवळ, बालेवाडी ,रोड, बाणेर, पुणे 411045 ,चतु:श्रृंगी ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9860101319

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उमेश विठ्ठल देवघडे | | | 1. फ्लट नं 404, एल बिल्डींग,, मधुवंती सोसायटी, नांदेड सिटी,,पुणे ,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | काळुराम ज्ञानदेव मारणे | | | 1. सनं 130, दांडेकर पुल, , सिंहगड रोड,, जय महाराष्ट्र मित्र मंडळाजवळ,, पुणे,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर, |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of **properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(रू. मध्ये))**:

10,000.00

11. Inquest Report / **U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. First **Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

जबाब ता. 28/12/2024
मी संदिप बबन चाकणकर, वय 42 वर्ष, धंदा - व्यवसाय (चालक), रा. सव्र्हे नंबर 149/1, चाकणकर मळा,
तान्हाई बिल्डींगजवळ, बालेवाडी रोड, बाणेर, पुणे 411045 मो- 9860101319.
समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझी आई, पत्नी सौ. अनुराधा चाकणकर व दोन मुलींसह
राहण्यास असून मी माझे स्वत:चे खाजगी वाहन चालवितो. माझे वडील बबन मारुती चाकणकर यांनी बाणेरगाव
सव्र्हे नंबर 143/8, 149/1, 131/1अ/2ब, 143/10 मधील वेगवेगळया क्षेत्रफळाच्या जमीन माझे पत्नी सौ.
अनुराधा चाकणकर हिचे नावे केलेबाबत दि. 31/05/2024 रोजी सह दुय्यम निंबधक कार्यालय, हवेली क्रमांक
16, पुणे येथे दस्त नं. 11732/2024 अन्वये मृत्युपत्र नोंदविले होते. त्यानंतर दि. 29/08/2024 रोजी माझे
वडील बबन मारुती चाकणकर यांचे निधन झाले. माझे वडीलांचे मृत्युनंतर त्यांच्या हयातीत नोंदविण्यात आलेल्या
मृत्युपत्राप्रमाणे वरील मिळकत माझी पत्नी सौ. अनुराधा संदिप चाकणकर हिचे नाव नोंदविण्यासाठी तलाठी
कार्यालयात दि. 18/10/2024 रोजी अर्ज दिला होता. त्यावेळी नाव नोंदणीकरीता आवश्यक असणारे सर्व
संबंधीत कागदपत्रे अर्जासोबत तलाठी कार्यालयात जमा केली होती. माझ्या पत्नीने दिलेल्या अर्जावर 2
महिन्यानंतरही कोणतीही कारवाई झाली नाही म्हणून मी माझ्या मोबाईलवरून दिनांक 16/12/2024 रोजी तलाठी
श्री. उमेश देवघडे यांचे मोबाईल क्रमांक 9272391333 यावर फोन करुन माझ्या पत्नीने दिलेल्या अर्जाचे काम
झाले का असे विचारले असता त्यांनी मला दि. 18/12/2024 ला तलाठी कार्यालय बाणेर येथे येण्यास सांगितले
होते. त्यानुसार मी दि 18/12/2024 रोजी तलाठी श्री. उमेश देवघडे यांची त्यांच्या बाणेर तलाठी कार्यालयात
जाऊन भेट घेतली असता तलाठी श्री. देवघडे यांनी मला मृत्युपत्रात नमुद केलेप्रमाणे वारस म्हणुन तुमच्या पत्नीचे
नाव लावण्यासाठी कमीत कमी 10,000 रुपये दयावे लागतील असे चर्चेदरम्यान त्यांनी मला सांगून माझ्याकडे
पैशांची मागणी केली होती परंतु मी माझ्या कामानिमीत्त बाहेरगावी गेल्याने आज रोजी तक्रार देण्यास आलो आहे.
यावरून सदरची रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाल्याने ती देण्याची माझी इच्छा नाही. माझे व तलाठी
श्री.उमेश देवघडे यांचे कोणतेही आर्थिक हितसंबंध नसून भांडण,तंटा अथवा वैर नाही सदरची तक्रार मी माझ्या
स्वहस्ताक्षरात लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, पुणे येथे लिहून देत आहे. माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणी
प्रकरणी आपल्या कार्यालयाकडून कारवाई होण्यास विनंती आहे अशा आशयाची लेखी तक्रार मी दिनांक
20/12/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे येथे दिली होती.
मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने सलग 2 शासकीय सुट्टया आल्याने दिनांक 23/12/2024 रोजी अॅन्टी करप्शन
ब्युरोतील श्रीमती मिसाळ, पोलीस उप अधीक्षक यांनी दोन पंचांसमक्ष पडताळणी कारवाई केली. त्यावेळी माझे व पंच
क्र. 1 जगदीश सुर्यकांत स्वामी यांचे निवेदन घेतले. मला व पंच क्र. 1 यांना सुचना देऊन शासकीय पंचासह



Scanned with CamScanner

माझ्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देऊन बाणेर तलाठी कार्यालयात पाठविले. मी व पंच क्र.1 असे माझे स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच.12.जे.टी.6225 वरुन तलाठी कार्यालय बाणेर येथे गेलो व तलाठी श्री. देवघडे यांची समक्ष भेट घेतली असता, त्यांनी माझेकडील डॉक्युमेंट जमा असलेबाबत विचारणा करून माझा नंबर घेऊन त्यांनी बोलाविल्यानंतर येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही तेथून अॅन्टी करप्शन ब्युरोच्या कार्यालयात परत आलो व माझे कामानिमीत्त बाहेर गेलो. त्यानंतर काही वेळाने मला तलाठी श्री. देवघडे यांचा माझे मोबाईलवर फोन आला व त्यांनी मला भेटण्यासाठी तहसिल कार्यालय, हवेली येथे बोलाविले त्याबाबत मी श्रीमती मिसाळ मॅडम, पोलीस उप अधीक्षक यांना कळविले असता त्यांनी मला माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर देऊन शासकीय पंचासह तहसिल कार्यालय हवेली येथे पडताळणीकामी सुचना देऊन पाठविले त्यावेळी मी तलाठी श्री. देवघडे यांची तहसिल कार्यालयाचे मेनगेटचे बाहेर समक्ष भेट घेतली त्यावेळी त्यांनी पंचांबाबत विचारणा करून पंचांना गेटचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यावेळी त्याठिकाणी तलाठी श्री. देवघडे यांच्यासोबत त्यांच्या कार्यालयातील त्यांचा मदतनीस हजर होता. मला तलाठी श्री देवघडे यांनी त्यांचे मदतनीसा सोबत पाठवुन ते तहसिल कार्यालयात गेले. तेथे माझे व तलाठी श्री. देवघडे यांच्या मदतनीसा सोबत बोलणे झाले व तो निघुन गेला. नंतर मी व पंच क्र.1 असे तहसिल कार्यालयाचे पॅरोजमध्ये थांबलेलो असताना काही वेळाने तलाठी श्री.देवघडे हे तहसिल कार्यालयातून बाहेर आले व मला म्हणाले की, मला प्रोटोकॉल लागलाय, मी तुमचे काम करून देतो, तुमच काय टेन्शन नका घेऊ, या तुम्ही असे म्हणून निघून गेले. त्यानंतर मी ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो.

त्यानंतर दिनांक 25/12/2024 रोजी तलाठी श्री.देवघडे यांनी मला फोन करून आज दि. 27/12/2024 रोजी बाणेर येथील तलाठी कार्यालयात येण्यास सांगितले होते. यावरून मी आज दि. 27/12/2024 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, पुणे येथे हजर झालो. त्यानंतर माझ्या तक्रारीचे अनुशंगाने आज दि. 27/12/2024 रोजी पुढील पडताळणी कारवाई करण्यात आली आहे त्यामध्ये मी माझे मोबाईलवरून लोकसेवक तलाठी श्री. देवघडे यांना फोन करून संपर्क केला असता त्यांनी कार्यालयात येण्यास सांगितले. सदरचा कॉल हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड करण्यात आला आहे. त्यानंतर माझे व पंच क्र.1 यांचे निवेदन घेऊन शासकीय पंचासह डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून सुचना देऊन आम्हाला पडताळणीकामी बाणेर तलाठी कार्यालयात पाठविण्यात आले. त्यावेळी तलाठी श्री. देवघडे यांची समक्ष भेट घेतली असता आमचेमध्ये वारस नोंदाचे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी मी म्हणालो की, नमस्कार ते आपलं, आपलं गेल्या वेळेस जे दहा हजाराचे बोलणे झालतं, असे म्हणलो असता तलाठी श्री.देवघडे हे म्हणाले त्यावर मी इतर चर्चा करून एवढे पण नाय का, दहा म्हटले तेव्हढ अॅडजेस्ट होत नाय म्हणून म्हटलं, किती कमीत कमी? असे म्हणालो असता तलाठी श्री.देवघडे म्हणाले की, त्यादिवशी म्हटले ना झालं म्हणून? मग आता कितीये? यावर मी किती पर्यत हे करू ते तर सांगा म्हणजे असे म्हणालो तेव्हा तलाठी श्री. देवघडे म्हणाले की, दहा करा यावर मी लाच रकमेबाबत तडजोड करीत असताना आत्ता आणले नाहीये, लगेच घेऊन येतो, तुम्ही सांगा फक्त किती आणायचे? त्यानुसार मी दहा? अशी विचारणा केली असता त्यांनी मला दहा आणा आज करून टाकू ते असे म्हणाले त्यावर मी दहा बारा मिनीटात येतो म्हणून ला.प्र.वि, पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर आमचेत डिजीटल व्हाईस रेकॉर्डवर रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपवर कॉपी करून फास्ट फॉरवर्ड करून पंचांसमक्ष ऐकले असता तलाठी श्री. देवघडे यांनी माझ्याकडे दहा हजार रूपये रोख रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर माझ्याकडे तलाठी श्री.देवघडे यांनी लाच मागणी केल्याने पुढील सापळा कारवाई करण्याचे नियोजीत करण्यात आले. त्यानुसार सापळा कारवाईकरीता तलाठी श्री.देवघडे यांना लाचेची रक्कम देण्याकरीता माझ्या बचतीमधील रोख रक्कम रु. 10,000/- पंचांसमक्ष हजर केले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर पंचांचे मदतीने लिहून घेण्यात आले. त्यानंतर आम्हाला अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून, प्रात्यक्षीक दाखवून मी हजर केलेल्या रकमेस अॅन्थ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम ही माझ्या शर्टच्या वरील डाव्या बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर माझे व पंच क्र.1 यांचे सापळा निवेदन 15.46 वा. घेऊन आम्हा सर्वांना योग्य त्या सुचना देऊन सापळा रचण्यात आला. मला लाच स्विकारल्यानंतर पुर्वनियोजीत इशारा करण्याची सुचना देण्यात आली. त्यानंतर मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून, मला व पंच क्र.1 लाचेच्या रकमेसह बाणेर तलाठी कार्यालय येथे पाठविण्यात आले ती वेळ 16.02 वा. होती.

सदर सापळा कारवाई दरम्यान मी बाणेर तलाठी कार्यालयात जाऊन तलाठी श्री. देवघडे यांची भेट घेतली. तेव्हा तलाठी श्री. देवघडे यांनी उजव्या हाताने इशारा करून लाच रक्कम त्यांचे शेजारी उभे असणारे व्यक्तीकडे देण्यास सांगितले तेव्हा मी त्यांना त्याच व्यक्तीकडे लाच रक्कम देण्याबाबत इशा-याने खात्री केली. त्यावरून सदरची लाच रक्कम स्विकारण्या-या व्यक्तीस नाव काय तुमच?, तुमच नाव काय? असे विचारले असता त्याने मारणे असे नाव सांगून नाय मित्रय, दहा येत ना? असे मला लाच रक्कमेबाबत विचारणा केली त्यानंतर मी माझ्या शर्टाच्या खिशातील



Scanned with CamScanner

लाच रक्कम उजवे हाताने काढून त्यांच्यासमोर धरून हं, मोजून घ्या एकदा, दहा हजारय, चेक करा एकदा असे
बोललो तेव्हा त्यांनी सदरची लाच रक्कम त्याच्या उजव्या हाताने स्विकारून सदरची लाच रक्कम दोन्ही हाताने
स्विकारली त्यानंतर मी सापळा पथकास लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला त्यावरून सापळा पथकाने
मारणे यांना लाचेची रक्कमेसह 16.06 वा. ताब्यात घेतले व पुढील कार्यवाही केली. मारणे यांचे ताब्यात मिळा...
रक्कम ही मी सापळा कारवाईदरम्यान हजर केलेलीच रोख रक्कम असल्याचे सापळा पथकाने खात्री केली तसेच
त्यांचे ताब्यात मिळालेल्या लाचेच्या रकमेची अल्ट्राव्हायोलेट दिव्याने पाहणी केल्यावर नोटांना व मारणे यांच्या दोन्ही
हाताच्या बोटांना अॅन्थ्रासीन पावडर लागली असल्याचे दिसून आले आहे. सदर कारवाई दरम्यान तलाठी श्री.
देवघडे यांना देखील ताब्यात घेतले आहे त्यानंतर बाणेर तलाठी कार्यालयाचे आवारात उभी असलेली तलाठी श्री.
देवघडे वापरत असणारी चारचाकी किया सेल्टॉस क्रमाक एम.एच. 16 सी.व्ही. 8200 हीची पंचांसमक्ष तपासणी
केली असता त्यामध्ये रोख रक्कम रू. 3,00,000/- मिळून आली आहे. सदरबाबत शासकीय कॅमेरामध्ये व्हिडीओ
रेकॉर्डींग करण्यात आली आहे या सर्व बाबींची सविस्तर पंचनामे व स्क्रिप्ट पंचांसमक्ष करण्यात आलेली आहे.
तरी मी दि. 20/12/2024 रोजी दिलेल्या तक्रारीवरून दि.23/12/2024, दि.27/12/2024 रोजी करण्यात
आलेली पडताळणी कारवाई व आज दि.27/12/2024 रोजी 16.06 वाजण्याचे सुमारास करण्यात आलेली
सापळा कारवाईवरून माझी पत्नी सौ. अनुराधा संदिप चाकणकर हिचे बाणेरगाव सव्र्हे नंबर 143/8, 149/1,
131/1अ/2ब, 143/10 या मिळकतीवर माझे वडीलांनी केलेल्या मृत्युपत्रानुसार वारस नोंद करण्याकरीता तलाठी
श्री. उमेश विठ्ठल देवघडे, वय 39 वर्षे, पद तलाठी, बाणेर सजा कार्यालय, पत्ता फ्लॅट नं. 404, एल बिल्डींग,
मधुवंती सोसायटी, नांदेड सिटी, पुणे यांनी स्वत:साठी रू. 10,000/- लाचेची मागणी करून त्यांच्या सांगण्यावरून
लाच रक्कम श्री. काळुराम ज्ञानदेव मारणे, वय 39 वर्षे, व्यवसाय खाजगी नोकरी, पत्ता- स.नं. 130, दांडेकर पुल,
सिंहगड रोड, जय महाराष्ट्र मित्र मंडळाजवळ, पुणे यांनी तलाठी कार्यालय, बाणेर कार्यालयाचे आवारात स्विकारली
आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द फिर्याद आहे.
सदरची फिर्याद ही माझे सांगणेप्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखित करणेत आली असून ती मी वाचुन पाहिली
असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

हा जबाब लिहुन दिला स.ता.म

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): vijayanand padmakar patil **No.(क्र.):** dgpvppm8501

Rank (पद): I (Inspector)

to take up the **Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Solankar

15 **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

28/12/24

ठाणे अंमलदार
चतु:श्रृंगी पो. स्टेशन पुणे शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MAHESH GUNDAPAA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the (If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान): Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner